| | पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,<br>**अनंतराव पवार महाविद्यालय पिरंगुट,ता. मुळशी, जि. पुणे ४१२ ११५** | | |
|---|---|---|---|
| विभाग | सांस्कृतिक | शैक्षणिक वर्ष | २०१९-२० |

# **अहवाल**

## स्वागत समारंभ

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्ष पदवीतील कला, वाणिज्य, विज्ञान, संगणकशास्त्र, व प्रथम वर्ष पदव्युत्तर मधील रसायनशास्त्र, वाणिज्य व कला शाखेतील विद्यार्थ्यांचे महाविद्यलाय व सांस्कृतिक विभागाच्या वतीने स्वागत करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांनी महाविद्यालयाची माहितीबरोबरच महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांची माहिती दिली. त्यांनी महाविदलयातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास मंडळ, शिष्यवृत्ती इत्यादी बद्दल माहिती दिली.

## शिक्षक दिन

०५ सप्टेंबर २०१९ रोजी महाविद्यालयात कला, वाणिज्य, विज्ञान व सांस्कृतिक विभागामार्फत शिक्षक दिनाचे आयोजन करण्यात आले. सदर दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका साकारली. शिक्षकदिनानिम्मित आयोजित केलेल्या कार्यक्रमात मा. प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांनी आपल्या शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करून शिक्षकांचे असणारे महत्व त्यांनी सांगित


## भोंडला कार्यक्रम

दिनांक ०५ /१०/२०१९ रोजी महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने महाविद्यालयातील विद्यर्थीनीसाठी भोंडला कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रम मध्ये विद्यार्थिनींनी भोंडला नृत्य सादर केले. कार्यक्रमात महाविद्यलयाचे प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी, उपप्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे, डॉ. प्रवीण चोळके, कार्यक्रमाचे समनव्यक डॉ. महेश कांबळे व सांस्कृतिक विभागाचे सर्व सदस्य उपस्थित होते.

## मा. शरदचंद्रजी पवारसाहेब यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

संस्थेचे जेष्ठ सदस्य, माजी केंद्रीय कृषिमंत्री व आपणा सर्वांचे आदरस्थान असलेले मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या १२ डिसेंबर या दिवशी वाढदिवसाचे औचित्य साधून सांस्कृतिक विभागाच्या वतीने दिनांक १२ डिसेंबर रोजी महाविद्यालयात विज्ञान प्रदर्शन व रांगोळी प्रदर्शन व शुक्रवार दिनांक १३ डिसेंबर २०१९ रोजी मार्केटिंग फेअर व फोटो प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. रांगोळी स्पर्ध्येमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांने उस्फुर्तपने भाग घेतला. रांगोळी स्पर्धेत एकूण ---रांगोळी विद्यार्थ्यांच्या मार्फत काढण्यात आल्या. सदर स्पर्ध्येत प्रथम क्रमांक द्वितीय क्रमांक, तृतीय क्रमांक व उत्तेजनार्थ अनुक्रमे..................... बक्षीस मिळवले. महाविद्यालयातील विज्ञान व सांस्कृतिक विभागाच्या वतीने विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले, या प्रदर्शनात महाविद्यालयातील विज्ञान विभागातील विद्यार्थ्यांनी विविध विषुयावरती पोस्टर्स, विविध विज्ञानाचे प्रयोग महाविद्यालयातील विद्यार्थ्यां दाखविण्यात आले. या प्रदर्शनात एकूण ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

शुक्रवार दिनांक १३ डिसेंबर २०१९ महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाच्या वतीने मार्केटिंग फेअर चे आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे खाद्य स्टॉल तसेच विविध कलाकसुरीच्या वस्तूंचे विक्रीसाठी स्टॉल उभारण्यात आले. महाविद्यालयातील पत्रकारिता विभागामार्फत विविध फोटोंचे प्रदर्शन भरवण्यात आले.











| जनसंवाद आणि पत्रकारिता विभागाच्या वतीने फोटोंचे प्रदर्शन कार्यक्रमांचे उद्घघाटन प्रसंगी मान्यवर | रांगोळी स्पर्धेतील विद्यार्थ्यांनी काढलेल्या रांगोळ्या |
| --- | --- |



विज्ञान प्रदर्शनादरम्यान प्रोजेक्ट चे सादरीकरण करताना विद्यार्थी



मार्केटिंग फेअर दरम्यान वस्तूंचे वितरण करताना विद्यार्थी

**राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबिरामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम**


सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना व अनंतराव पवार महाविद्यालय, पिरंगुट ता. मुळशी जि. पुणे यांच्या सयुंक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबिर मौजे खारवाडे ता. मुळशी जि. पुणे या ठिकाणी दिनांक १८/१२/२०१९ ते २४/१२/२०१९ या कालावधीत आयोजित केले होते. शिबिरामध्ये सायंकाळी ७.०० ते ८.३० या कालावधीत विद्यार्थ्यांनी विविध समाजप्रबोधनपर विषयावर गीत गायन, नाटिका, एकांकिका, पथनाट्य अभंग व ग्रामीण खेळांचे आयोजन करण्यात आले. ग्रंथपाल प्रा. अविनाश हुंबरे यांचा गीत गायनाचा कार्यक्रम झाला. खारवडे गावातील ग्रामस्थांसाठी विद्यार्थ्यांनी रस्सीखेच आयोजन केले सदर कार्यक्रमात ग्रामस्थांनी उस्फुर्तपणे प्रतिसाद दिला.



रा. सो. यो. शिबिरामध्ये विविध कला सादर करताना विद्यार्थी

## पुणे जिल्हा शिक्षण मंडळ आयोजित जिल्हा क्रीडा स्पर्ध्येत  सांस्कृतिक कार्यक्रम

संस्थेचे जेष्ठ सदस्य, माजी केंद्रीय कृषिमंत्री व आपणा सर्वांचे आदरस्थान असलेले मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे या वर्षी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाने जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धेचे  आयोजन श्री. छत्रपती शिवाजी  महाराज क्रीडानगरी बालेवाडी पुणे येथे  दिनांक २७ व २८ डिसेंबर २०१९ रोजी  आयोजन करण्यात आले. या स्पर्ध्येच्या समारोप प्रसंगी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने "जय हो" या देशभक्तीपर गीतावरती सामूहिक नृत्य सादर करून करून विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. या नृत्यामध्ये एकूण ७६ विद्यार्थ्यांचा सहभाग होता.




“जय हो" या देशभक्तीपर गीतावरती सामूहिक नृत्य सादर विद्यार्थी

**कर्मवीर करंडक २०१९-२० मध्ये सहभाग**

रयत शिक्षण संस्थेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय औंध यांच्या वतीने दिनांक ०३/०१/२०२० रोजी पथनाट्य स्पर्ध्येचे आयोजन करण्यात आले होत. महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या वतीने महिला सबलीकरण या विषयावर पथनाट्य सादर केले.




महिला सबलीकरण या विषयावर पथनाट्य सादर करताना विद्यार्थी

**कविसंमेलन व वक्तृत्व स्पर्धेमध्ये सहभाग**

बाबुरावजी घोलप महाविद्यालय सांगवी , मराठी विभाग व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या सयुंक्त विद्यमाने ओयोजित दिनांक १६/०१/२०२० रोजी कविसंमेलन व वक्तृत्व स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील कु. दीपाली साठे व कु. प्रणाली ओझरकर यांनी सहभाग घेतला







कु. दीपाली साठे व कु. प्रणाली ओझरकर वक्तृत्व स्पर्धेमध्ये सादरीकरण करताना

**प्रजासत्ताक दिनी सांस्कृतिक कार्यक्रम**

रविवार दिनांक २६ जानेवारी २०२० रोजी महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने राष्ट्रगीत, ध्वजगीत, प्रार्थना तसेच देशभक्तीपर गाण्यावरत नृत्य, समूहनृत्यचे सादरीकरण करण्यात आले.







**शारदा पतंग महोत्सव**

जिल्हा शिक्षण मंडळ पुणे, आयोजित “ शारदा पतंग महोत्सव ” रविवार दिनांक ०२ फेब्रुवारी २०२० रोजी सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:०० या वेळेत पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अनंतराव पवार महाविद्यालय, पिरंगुट ता. मुळशी, जि. पुणे येथे संपन्न झाला. सदर महोत्सवासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून विविध महाविद्यालयांतून विद्यार्थी, विद्यार्थिनी, स्पर्धक तसेच संस्था पदाधिकारी व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

सदर महोत्सवाच्या उद्घघाटन प्रसंगी अनंतराव पवार महाविद्यालय पिरंगुट यांच्या मार्फत विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे, या सांस्कृतिक कार्यक्रमात प्रार्थना तसेच देशभक्तीपर गाण्यावरत नृत्य, समूहनृत्यचे सादरीकरण करण्यात आले. . तसेच न्यू इंग्लिश स्कूल व जुनिअर महाविद्यालय पिरंगुट यांचा नृत्य व ढोल लेझीम पथकाचा सांस्कृतिक सादरीकरण करण्यात आले.



शारदा पतंग महोत्सवात विविध कला सादर करताना विद्यार्थी

**वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रम**

महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम मंगळवार दिनांक १८/०२/२०२० रोजी महाविद्यालयात संपन्न झाला. वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपल्यानंतर महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात ग्रुप डान्स, सोलो डान्स, फनी डान्स, मिमिक्री अशा एकूण १० कार्यक्रमाचा सहभाग होता.




सांस्कृतिक विभागाच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करताना विद्यार्थी

डॉ. महेश कांबळे
समन्वयक, सांस्कृतिक विभाग

डॉ. शर्मिला चौधरी
प्राचार्य